# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार - ब

वर्ष १, अंक २७(२) ] बुधवार, मे २७, २००९ ज्येष्ठ ६, शके १९३१ [पृष्ठे ९

किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ८९

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ मे २००९

आदेश

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४.**

क्रमांक राजम. २००९/(७१/०९)/विशि-२.—विद्यापीठाचे कुलगुरु हे विद्यापीठाचे शैक्षणिक व कार्यकारी प्रमुख असून विद्यापीठाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि विद्यापीठाच्या सुसंचालनासाठी विद्यापीठाचे शैक्षणिक कार्यक्रम आणि सर्वसाधारण प्रशासनाच्या विकासासाठी ते जबाबदार आहेत ;

आणि शिक्षणाची उच्च पातळी, उत्तम दर्जाच्या संशोधनास प्रोत्साहन, सहकार्यात्मक व्यवस्थापन, उच्च शिक्षणाचा प्रचार व प्रसार, योग्य तंत्रज्ञान व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कुलगुरुंनी कार्य करणे आवश्यक आहे ;

आणि राष्ट्रीय व सामाजिक प्राधम्य विचारात घेऊन विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व घडविण्याची जबाबदारी कुलगुरुंची आहे ;

आणि वरील बाबींच्या अनुषंगाने कुलगुरु पदाचे महत्व विचारात घेता या पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीकडे विहित अशी अर्हता व अनुभव असणे आवश्यक आहे ;

म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) मधील कलम १२ उपकलम (३क) खंड (घ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या व त्या अंतर्गत येणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व कुलपती यांचेशी विचारविनिमय करून शासन या आदेशाद्वारे शासन स्पष्ट करीत आहे की :—

(१) कुलगुरु पदासाठी समितीमार्फत शिफारस केल्या जाणाऱ्या व्यक्तीकडे खालील परिशिष्टामधील भाग-अ अनुसार आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व अनुभव आणि भाग-ब व भाग-क अनुसार ऐच्छिक स्वरुपाचे अनुभव व अपेक्षीत कौशल्य व क्षमता असणे आवश्यक आहे.

(२) परिशिष्टामधील भाग-ड अन्वये अर्ज करण्याच्या पद्धतीबाबत निर्देश दिलेले आहेत.

## परिशिष्ट

### भाग-अ

**आवश्यक अर्हता व अनुभव**

(१) कोणत्याही विद्याशाखेतील डॉक्टरेट आणि शैक्षणिक क्षेत्रातील चांगला पूर्वेतिहास (रेकॉर्ड).

(२) विद्यापीठ स्तरावर किंवा नावाजलेल्या संस्थेमध्ये पदवीपूर्व व पदव्युत्तर पातळीवर कमीतकमी १५ वर्षांचा अध्यापन आणि संशोधनाचा अनुभव असावा.

(३) पीएच.डी. नंतर किमान ५ संशोधन पेपर मान्यता प्राप्त अशा आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलसमध्ये प्रकाशीत केलेले असावेत आणि/ किंवा मान्यताप्राप्त विद्याशाखेतील गुणात्मक दर्जा असलेली व राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षणसाठी संदर्भग्रंथ म्हणून वापरल्या जातील अशी पुस्तके प्रकाशीत केलेली असावीत.

(४) प्राध्यापकापेक्षा कमी दर्जा नसलेला आणि विद्यापीठातील विभाग प्रमुख/वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य (प्राध्यापक दर्जाचे)/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय ॲडव्हान्स लर्निंग संस्थांचे प्रमुख म्हणून किमान ५ वर्षांचा प्रशासकीय अनुभव.

(५) महत्त्वपूर्ण अशा किमान एका संशोधन प्रकल्पाचे संचलन केलेले असावे.

(६) आंतरराष्ट्रीय संस्था किंवा संघटना यांच्या देशाबाहेरील कार्यशाळा, सेमिनार्स किंवा परिषदांमध्ये सहभागात्मक स्वरुपाच्या कार्यांचा अनुभव.

(७) उच्च शिक्षणाशी संबंधीत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यशाळा, सेमिनार, परिषदांचे देशात आयोजनाचा अनुभव.

(८) सप्रमाण नेतृत्वाचा अनुभव.

भाग-ब

**ऐच्छिक (इष्ट) अनुभव**

(१) विद्यापीठाची सांविधानीक प्राधिकरणावरील (उदा. अभ्यास मंडळ, विद्या परिषद, कार्यकारी परिषद अथवा व्यवस्थापन परिषद, अधिसभा इत्यादी) कार्यांचा अनुभव.

(२) दर्जात्मक बाबी, अधिस्विकृती (Assessment), मूल्यनिर्धारण (Accreditation) इत्यादी प्रक्रियांचा प्रत्यक्ष अनुभव.

(३) पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा अनुभव.

(४) महाराष्ट्र विद्यापीठातील अधिनियमातील तरतुदीनुसार विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होण्यासाठी राज्य किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थीकेंद्रीत कार्यक्रम राबवण्याचा अनुभव.

भाग-क

**अपेक्षित कौशल्य व क्षमता**

**१. तंत्रज्ञानात्मक कौशल्य —**

(अ) तंत्रज्ञानाचा खुलेपणाने अंगिकार करणे आणि त्या तंत्रज्ञानाच्या ज्ञानाधारीत उपयुक्ततेबाबत प्रगट विश्वास ;

(ब) तंत्रज्ञानाच्या वापराबाबत उच्च पातळीवरील हातोटी.

**२. व्यवस्थापकीय कौशल्य —**

(अ) अपेक्षित घटना व समस्यांवर मात करण्याची व त्यासाठी आधीपासून डावपेचात्मक आराखडा तयार करण्याची योग्यता ;

(ब) संसाधनांची निर्मिती व त्यांचे न्याय्यवाटप करण्याची योग्यता ;

(क) दबावाला न जुमानता परिणामकारकपणे काम करण्याची तसेच कामाचे व्यवस्थापन व उपलब्ध संसाधनाचा कालमर्यादेत वापर करण्याची क्षमता ;

(ड) वित्तीय व्यवस्थापन उदा. उत्पन्न स्त्रोताची निर्मिती, त्यांचे नियोजन व वित्तीय नियंत्रण इ. बद्दलचे प्रगल्भ ज्ञान.

**३. राज्य पातळीवर तसेच राष्ट्रीय पातळीवरील संस्था, व्यावसायिक संघटना इत्यादींशी सहकार्य करार —**

(अ) महत्त्वाच्या क्षेत्रातील समाजाच्या अपेक्षा व गरजा ओळखण्याची क्षमता ;

(ब) राष्ट्रापुढील आव्हानांचे सखोल ज्ञान आणि राष्ट्राच्या विकासात्मक गरजांना उच्च शिक्षण कसे प्रतिसाद देऊ शकेल याबाबतचे ज्ञान ;

(क) अभ्यासक्रमांच्या विकासाबाबत विशेषत: समाजाचा अंतर्भाव व सहभाग विस्तृतपणे वाढविणाऱ्या अभ्यासक्रमांची विशेष जाण ;

**४. नेतृत्व क्षमता —**

(अ) विविध लाभार्थी गटांना उद्युक्त करण्याची अपवादात्मक क्षमता ;

(ब) संघटना/संस्थेचे ध्येय व उद्दिष्ट पुढे नेण्याची प्रबळ इच्छाशक्ती ;

(क) डावपेचात्मक, सृजनात्मकदृष्ट्या व विस्तृतपणे विचार करण्याची क्षमता ;

(ड) स्वउदाहरणाने नवीन कल्पनांचा अंगीकार व त्या संवादात्मक दृष्टीकोनातून राबविण्याची क्षमता ;

**५. संवादात्मक व सहकार्यात्मक कौशल्य —**

(अ) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर सहकार्याच्या विकासामध्ये व अंमलबजावणीमध्ये उल्लेखनीय यश ;

(ब) वरीष्ठ पातळीवर, मोठ्या व्यासपीठावर तसेच वैयक्तिक पातळीवर स्वत:च्या सखोल ज्ञानाच्या आधारे परिणामकारकपणे संवाद साधण्याची व मतपरीवर्तन करण्याची क्षमता ;

(क) व्यावसायिक संस्था व संघटनांचे सक्रीय सदस्यत्व ;

भाग-ड

**ध समितीद्वारे योग्य उमेदवारांचा विचार करण्यासाठी पद्धती.**

(१) शोध समितीने स्वत:च्या किंवा निष्णात शिक्षणतज्ञांच्या शिफारशीनुसार योग्य उमेदवारांचा शोध घ्यावा.

(२) याशिवाय समितीकडे प्राप्त अर्जांचा देखील शोध समितीने विचार करावा.

(३) योग्य उमेदवाराने/अर्जदाराने त्याची शैक्षणिक पात्रता, अनुभव तसेच उल्लेखनीय कार्य याबाबत कालक्रमानुसार माहिती द्यावी. याव्यतिरिक्त त्यांनी कुलगुरुपदी निवड होण्यासंबंधीच्या अर्हता पुर्ततेबाबत आणि उमेदवारीच्या समर्थनार्थ सारांश रुपाने स्पष्टीकरण द्यावे. जेणेकरून उमेदवारांची क्षमता/योग्यता तपासण्यासाठी शोध समितीला निवड प्रक्रिया राबवितांना मदत होईल.

(४) शोध समिती पात्र उमेदवारासाठी पात्रता/अटी शिथिल करू शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. स. सहारिया,**
शासनाचे प्रधान सचिव.